सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.संकीर्ण-०१२५/प्र.क्र.१८/विशा-३(अ), दि. २०/०६/२०२५
२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.संकीर्ण-०१२५/प्र.क्र.१८/विशा-३(अ), दि. २३/०६/२०२५

**विषय** :- राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन एलईडी/एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभावीपणे सामाजिक जनजागृतीकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-०१२५/प्र.क्र.१८/विशा-३(अ), दि.२०/०६/२०२५ व समक्रमांकीत दि.२३/०६/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक अनुक्रमे २०२५०६२०१८३१४८०३२९ व २०२५०६२३१७४२२१५१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 24-06-2025 16:44:12

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, सायबर सुरक्षा,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक,कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण"या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन एलईडी/ एलसीडी स्क्रीनव्दारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभावीपणे सामाजिक जनजागृतीकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०१२५/प्र.क्र.१८/विशा-३(अ)**

मंत्रालय,मुंबई-४०००३२

दिनांक : २० जून, २०२५

**संदर्भ:-**

१) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज २०१७/प्र.क्र.१५३/ का.३४, दि.२१.०७.२०१७**

२) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज/२०२१/प्र.क्र.१२६/का-३४, दि.१३.०८.२०२१**

३) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२३/प्र.क्र.१८७/का-३४, दि.२३.११.२०२३**

४) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२५/प्र.क्र.१३२/मावज १, दि.०३.०६.२०२५**

**प्रस्तावना:-**

सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वाढली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व सामान्य नागरिक ऑनलाइन फसवणूक, आर्थिक घोटाळे, ओळख चोरी (Identity Theft) आणि डिजिटल खंडणी यांना बळी पडत आहेत. सद्यस्थितीत सायबर गुन्हेगार शहरी भागापुरते मर्यादित न राहता निमशहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येला अधिकाधिक लक्ष्य करीत आहेत. महाराष्ट्रातील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याबाबतची पुरेशी जागृती नसल्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. सायबर गुन्ह्याला आळा घालण्यासाठी समाज माध्यमाद्वारे सायबर गुन्ह्याबाबतची जागृती करणे हा प्रभावी मार्ग आहे. सदर सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविरित्या संदेशवहन, माहितीचे आदान-प्रदान, शिक्षण देण्यात आले तर सायबर गुन्ह्याबाबत जागृकता मोहिम प्रभाविरित्या वाढेल.

सदर उपाययोजनांचा एक भाग म्हणून राज्यात सायबर गुन्ह्याबाबत राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन एलईडी/एलसीडी स्क्रीनव्दारे जनजागृती करण्याठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात आलेल्या आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यात सायबर गुन्ह्याबाबत जागृती करण्यासंदर्भात राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन एलईडी /एलसीडी स्क्रीनव्दारे जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत तयार करण्यात आलेल्या खालील तक्त्यामधील जनजागृती आराखड्यास संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व

२ मधील तरतुदीनुसार रु.३१,९०,००,०००/- इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | माध्यम | मुळ दर,प्रक्रिया | तपशील | वारंवारिता | संख्या/दिवस | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासाह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाह्य माध्यमाद्वारे प्रसिध्दी (प्रदर्शने शाखा) | | | | | | | |
| १ | राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरील एकूण ५९० एलईडी एलसीडी स्क्रीनवरुन सायबर गुन्ह्याबाबत जाहिरातीद्वारे प्रसिद्धी | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability. | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १ वर्षाकरीता | २६,५०,००,००० | ४,७७,००,००० | ३१,२७,००,००० |
| | | | | | **एकूण** | **२६,५०,००,०००** | | **३१,२७,००,०००** |
| १ | शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उवरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च संशोधन खर्च, वाहतूक खर्च इतर किरकोळ खर्च | | | ६३,००,००० | | ६३,००,००० |
| | | | | | **एकूण खर्च** | **२७,१३,००,०००** | | **३१,९०,००,०००** |

०२. उपरोक्त नमूद प्रसिध्दीची कार्यवाही ही सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १३.०८.२०२१ मधील तरतुदीनुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात यावी. तसेच उपरोक्त नमूद जनजागृतीकरीता होणाऱ्या खर्चाचे देयके अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांच्याकडे सादर करावे.

०३. प्रसिध्दीकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत निवड करण्यात आलेल्या संस्थेकडून उपरोक्त तक्यात नमूद करण्यात आलेल्या प्रसिध्दीची कार्यवाही करतांना गृह विभागाकडून मजकूर प्राप्त करून कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार प्रसिध्दी करण्यात यावी.

तसेच प्रसिध्दीसंदर्भातील आवश्यक सर्व पुरावे सादर करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

०४. उपरोक्त माध्यमाव्दारे प्रसिध्दी करतांना राज्यात सायबर सुरक्षा विषयक राज्य शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, घेण्यात येणारे धोरणात्मक निर्णय तसेच प्रचलित नियमानुसार करण्यात येणारी मदत याबाबत जनजागृती व प्रसिध्दी करण्यात यावी.

०५. ज्या संस्थेकडून उपरोक्त नमूद प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात येणार आहे त्या संस्थेकडून खालील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक करण्यात यावे.

अ) प्रसिध्दीसाठी वापरावयाचा मजकूर विभागाकडून प्राप्त करून पुढील कार्यवाही करावी. सदर प्रसिध्दीसंदर्भातील ठिकाणांचे Geo Tagging Photo विभागास सादर करणे व त्यात दिनांक व वेळ असणे आवश्यक राहील. प्रसिध्दी संदर्भातील संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्रसिध्दी करण्यात आली असल्याबाबत आवश्यक दस्तऐवज शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

आ) उपरोक्त माध्यम आराखड्यासंदर्भातील देयके ही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार विहीत प्रचलित कार्यपद्धती प्रमाणे करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांच्याकडे सादर करावित.

इ) सदर निधी आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर,मुंबई हे "नियंत्रण अधिकारी" तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/प्रशासकीय अधिकारी (सायबर व म.अ.प्र.),महाराष्ट्र राज्य, मुंबई हे "आहरण व संवितरण अधिकारी" राहतील.

ई) उपरोक्त नमूद अटी-शर्ती तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालायाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यादेशातील अटी-शर्तीची पूर्तता केल्यानंर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

०६. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक.बी-०१, २०५५ -पोलीस (००)(१०१) गुन्हे अन्वेषण व दक्षता (००) (०६) सायबर व महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष (अनिवार्य) लेखाशिर्ष क्रमांक (२०५५ A०२३) मधील २६- जाहिराती व प्रकाशने या उद्दिष्टांतर्गत सन २०२५-२६ या वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

०७. उपरोक्त निधी खर्च करतांना वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७.०४.२०२५ नमूद करण्यात आलेल्या परिच्छेद ५ ते १९ मधील मार्गर्शक सूचना व परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे व वेळोवेळी विहीत विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

०८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३८७/२०२५/व्यय-७ दि. ०२.०६.२०२५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२५०६२०१८३१४८०३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAHUL VIJAY KULKARNI

Digitally signed by RAHUL VIJAY KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=31493D4A6291F531ED8FD00972CCBFA0376623C7F6C38C3B848BFBE06685A219, cn=RAHUL VIJAY KULKARNI
Date: 2025.06.20 18:32:35 +05'30'

**(राहुल कुलकर्णी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई.
७) सह सचिव/उप सचिव (कार्यासन अर्थसंकल्प), गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११) वित्त विभाग/व्यय-७, गृह विभाग /अर्थ-१ मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती/विशा-३(अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

**राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन (महारेल) एलईडी/एलसीडी स्क्रीनव्दारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभावीपणे सामाजिक जनजागृतीकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०१२५/प्र.क्र.१८/विशा-३(अ)**
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : २३ जून, २०२५

संदर्भ:-

१) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज २०१७/प्र.क्र.१५३/ का.३४, दि.२१.०७.२०१७**
२) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज/२०२१/प्र.क्र.१२६/का-३४, दि.१३.०८.२०२१**
३) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२३/प्र.क्र.१८७/का-३४, दि.२३.११.२०२३**
४) **सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०२५/प्र.क्र.१३२/मावज १, दि.०३.०६.२०२५**
५) **समक्रमांकाचे शासन निर्णय, दि.२०.०६.२०२५**

प्रस्तावना:-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि.१३.०६.२०२५ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार महारेल टिव्हीच्या डिजीटल स्क्रीनव्दारे सायबर गुन्ह्याबाबतच्या योजनांच्या प्रचार व प्रसिध्दी करण्याच्या आराखड्यास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने, उपरोक्त संदर्भाधीन क्र.५ नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सायबर गुन्ह्यांची व्याप्ती वाढली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व सामान्य नागरिक ऑनलाइन फसवणूक, आर्थिक घोटाळे, ओळख चोरी (Identity Theft) आणि डिजिटल खंडणी यांना बळी पडत आहेत. सद्यस्थितीत सायबर गुन्हेगार शहरी भागापुरते मर्यादित न राहता निमशहरी व ग्रामीण भागातील लोकसंख्येला अधिकाधिक लक्ष्य करीत आहेत. महाराष्ट्रातील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याबाबतची पुरेशी जागृती नसल्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. सायबर गुन्ह्याला आळा घालण्यासाठी समाज माध्यमाद्वारे सायबर गुन्ह्याबाबतची जागृती करणे हा प्रभावी मार्ग आहे. सदर सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविरित्या संदेशवहन, माहितीचे आदान-प्रदान, शिक्षण देण्यात आले तर सायबर गुन्ह्याबाबत जागृकता मोहिम प्रभाविरित्या वाढेल.

सदर उपाययोजनांचा एक भाग म्हणून राज्यात सायबर गुन्ह्याबाबत राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन (महारेल) एलईडी/एलसीडी स्क्रीनव्दारे जनजागृती करण्याठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात आलेल्या आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

राज्यात सायबर गुन्ह्याबाबत जागृती करण्यासंदर्भात राज्यातील रेल्वे स्थानकांवरुन (महारेल) एलईडी/एलसीडी स्क्रीनव्दारे जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत तयार करण्यात आलेल्या खालील तक्त्यामधील जनजागृती आराखड्यास संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ मधील तरतुदीनुसार रु.३१,९०,००,०००/- इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| महारेल, एलईडी/एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबतच्या योजनांच्या प्रचार व प्रसिद्धीचा आराखडा | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | माध्यम | मुळ दर,प्रक्रिया | तपशील | वारंवारिता | संख्या/दिवस | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करासाह |
| | बाह्य माध्यमाद्वारे प्रसिध्दी प्रदर्शने शाखा) | | | | | | | |
| १ | राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरील एकूण ५९० (महारेल) एलईडी/ एलसीडी स्क्रीनवरुन सायबर गुन्ह्याबाबत जाहिरातीद्वारे प्रसिद्धी | CBC (DAVP) यादीवरील व दर | As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability. | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १ वर्षाकरीता | २६,५०,००,००० | ४,७७,००,००० | ३१,२७,००,००० |
| | | | | | **एकूण** | **२६,५०,००,०००** | | **३१,२७,००,०००** |
| १ | शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उवरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च संशोधन खर्च, वाहतूक खर्च इतर किरकोळ खर्च | | | ६३,००,००० | | ६३,००,००० |
| | | | | | **एकूण खर्च** | **२७,१३,००,०००** | | **३१,९०,००,०००** |

०२. उपरोक्त नमूद प्रसिध्दीची कार्यवाही ही सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १३.०८.२०२१ मधील तरतुदीनुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात यावी. तसेच उपरोक्त नमूद जनजागृतीकरीता होणाऱ्या खर्चाचे देयके अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांच्याकडे सादर करावे.

०३. प्रसिध्दीकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत निवड करण्यात आलेल्या संस्थेकडून उपरोक्त तक्यात नमूद करण्यात आलेल्या प्रसिध्दीची कार्यवाही करतांना गृह विभागाकडून मजकूर प्राप्त करून कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच प्रसिध्दीसंदर्भातील आवश्यक सर्व पुरावे सादर करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

०४. उपरोक्त माध्यमाव्दारे प्रसिध्दी करतांना राज्यात सायबर सुरक्षा विषयक राज्य शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, घेण्यात येणारे धोरणात्मक निर्णय तसेच प्रचलित नियमानुसार करण्यात येणारी मदत याबाबत जनजागृती व प्रसिध्दी करण्यात यावी.

०५. ज्या संस्थेकडून उपरोक्त नमूद प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात येणार आहे त्या संस्थेकडून खालील बाबींची पूर्तता करणे बंधनकारक करण्यात यावे.

अ) प्रसिध्दीसाठी वापरावयाचा मजकूर विभागाकडून प्राप्त करून पुढील कार्यवाही करावी. सदर प्रसिध्दीसंदर्भातील ठिकाणांचे Geo Tagging Photo विभागास सादर करणे व त्यात दिनांक व वेळ असणे आवश्यक राहील. प्रसिध्दी संदर्भातील संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडून प्रसिध्दी करण्यात आली असल्याबाबत आवश्यक दस्तऐवज शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

आ) उपरोक्त माध्यम आराखड्यासंदर्भातील देयके ही माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार विहीत प्रचलित कार्यपद्धती प्रमाणे करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई यांच्याकडे सादर करावित.

इ) सदर निधी आहरित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर,मुंबई हे “नियंत्रण अधिकारी” तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/प्रशासकीय अधिकारी (सायबर व म.अ.प्र.),महाराष्ट्र राज्य, मुंबई हे “आहरण व संवितरण अधिकारी” राहतील.

ई) उपरोक्त नमूद अटी-शर्ती तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालायाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या कार्यादेशातील अटी-शर्तीची पूर्तता केल्यानंर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

०६. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक.बी-०१, २०५५ -पोलीस (००)(१०१) गुन्हे अन्वेषण व दक्षता (००) (०६) सायबर व महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष (अनिवार्य) लेखाशिर्ष क्रमांक (२०५५ A०२३) मधील २६-जाहिराती व प्रकाशने या उद्दिष्टांतर्गत सन २०२५-२६ या वर्षात उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

०७. उपरोक्त निधी खर्च करतांना वित्त विभाग,शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७.०४.२०२५ नमूद करण्यात आलेल्या परिच्छेद ५ ते १९ मधील मार्गर्शक सूचना व परिशिष्टामधील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे व वेळोवेळी विहीत विवरणपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

०८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३८७/२०२५/व्यय-७ दि. ०२.०६.२०२५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२५०६२३१७४२२१५१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAHUL VIJAY KULKARNI

Digitally signed by RAHUL VIJAY KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=31493D4A6291F531ED8FD00972CCBFA0376623C7F6C38C3B848BFBE06685A219, cn=RAHUL VIJAY KULKARNI
Date: 2025.06.23 17:43:12 +05'30'

**(राहुल कुलकर्णी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य सायबर, मुंबई.
७) सह सचिव/उप सचिव (कार्यासन अर्थसंकल्प), गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११) वित्त विभाग/व्यय-७, गृह विभाग /अर्थ-१ मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती/विशा-३(अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.